

**डॉ. रवींद्र गोडसे,** शिक्षण - डोंबिवली, ठाणे व परळ (के.ई.एम. रुग्णालय) येथे झाले. भारतातील एम.डी.नंतर अमेरिकेत पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून सध्या तेथेच खाजगी वैद्यकीय व्यवसाय. बुद्धिबळ, ब्रिज व गॉल्फ हे छंद असून इतिहासाचे अतोनात वेड. जर्मन विद्यापीठात इतिहासाच्या पीएच.डी.साठी अभ्यास चालू. युरोपच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत गाडीने फिरण्याची आणि युरोपच्या इतिहासातील वेगवेगळ्या रणभूमींना भेटी देण्याची विलक्षण ओढ. याच लेखकाची '2 guys 3 girls and a mad professor' ही इंग्रजी कादंबरी नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. या कादंबरीच्या वाचकांतील हौशी कलाकारांना एकत्र करून या कादंबरीवर एक डिजिटल चित्रपट बनवण्याचा प्रकल्प मार्गी लागला आहे.